# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२–२२३१०४ E-Mail : registrar.gondwanauniversity@gmail.com

जा.क्र./गोंवीग/कुसका/3227/२०१७ दिनांक ०३/०६/२०१७

प्रति,

मा. संस्था अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.

विषय:– विद्यापीठास ५ वर्षाच्या सम्यक योजना (Perspective Plan) तयार करण्यासाठी नाविण्यपुर्ण व रोजगाराभिमुख अभ्यासक्रम/विषयांची माहिती कळविण्याबाबत.

संदर्भ :– विद्यापीठाचे पत्र क्र. गों.वि./कुलसका/३०३६/२०१७, दि. २६/०५/२०१७

महोदय,

उपरोक्त संदर्भाकिंत विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, मधील तरतूदीनुसार विद्यापीठाद्वारे उच्च शिक्षणाच्या सुविधांचे समन्यायी वाटप होण्याकरिता विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील न्युनविकसीत क्षेत्रांच्या गरजांचा योग्य तो विचार करून उच्च शिक्षणाकरिता महाविद्यालयांची ठिकाणे निश्चित करावयाची आहेत. सोबतच सदर कार्यक्षेत्रातील सामाजिक व आर्थीक गरजांचा, नोकरीच्या उपलब्ध संधीचा व उद्योगांच्या आवश्यकतांचा अभ्यास करून नविन अभ्यासक्रमांचा/विषयांचा समावेश करून सम्यक योजना तयार करावयाची असल्यामुळे संदर्भीय पत्रानुसार सम्यक योजनेमध्ये समावेश करण्यासाठी काही नाविण्यपुर्ण/रोजागाराभिमूख अभ्यासक्रम/विषय सुचवावयाचे असतील तर ते सादर करण्याबाबत कळविलेले होते.

सम्यक योजना (Perspective Plan) महाविद्यालयास नाविण्यपुर्ण/रोजगाराभिमूख अभ्यासक्रम/उपक्रम सुचवावयाचे असल्यास त्यांनी दिनांक १२ जून, २०१७ पर्यंत कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांचेकडे लेखी स्वरूपात विस्तृत माहितीसह कळवावे. जेणेकरून नाविण्यपूर्ण व रोजगाराभिमूख असलेल्या अभ्यासक्रम/विषयांचा समावेश सम्यक योजनेमध्ये करता येणे शक्य होईल.

धन्यवाद!

कुलसचिव,(का.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलीपी :–

मा. कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव समादाराने सादर.